**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलीप बन्सीलाल बोरा<br>४०३७/अ, महाजन गल्ली, अहमदनगर-१ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, जुन्नर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ता श्री. दिलीप बन्सीलाल बोरा यांनी मौजे मंगरूळ येथील कुळकायदा केस नं.३२-ग-०४३/८७ मधील जबाबाच्या प्रती व इतर कागदपत्रे मागितली होती.

सदरची माहिती आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. ६.६.२००७ च्या पत्राने लेखी कळविले. दि. १५.१०.२००७ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार जुन्नर यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिला. दप्तरातील कागदपत्रांचा शोध घेऊन एक महिन्यात कागदपत्रे श्री. बोरा यांना द्यावी, असा आदेश त्यांनी दिला. त्यानुसार अभिलेख शोधपथक नेमून अभिलेखाचा शोध घेण्यात आला. दि. १४.३.२००८ रोजी संबंधित अव्वल कारकून यांच्या दप्तरात अभिलेख सापडले. त्यानंतर त्याच दिवशी माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जुन्नर यांनी स्पष्ट केले.

मागितलेली माहिती मिळालेली आहे. त्यानुसार अपील निकाली काढण्यात यावे, असे अपीलकर्त्याने वरील तीनही घटकांमधील चर्चेअंती लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. कागदपत्रांचा आढळ होत नाही, असे कळविणे पुरेसे नाही. त्यांचा शोध घेऊन नागरिकाला ती देण्याची भूमिका असली पाहिजे, हेच यातून स्पष्ट होते. तहसीलदार जुन्नर श्री. संजय तेली यांची ही कृती उल्लेखनीय आहे. त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात उपविभागीय अधिकारी, खेड उपविभाग, खेड, जि. पुणे यांनी त्याची नोंद करावी.

पुणे
दि. ३०.८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. पांडुरंग आबा कांबळे<br>१०, रोशनी अपार्टमेंट, बिबवेवाडी, पुणे-३७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक विक्रीकर आयुक्त, कार्यालय,<br>पुणे क्षेत्र, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर विक्रीकर आयुक्त कार्यालय,<br>पुणे क्षेत्र, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. पांडुरंग आबा कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त, कार्यालय, पुणे क्षेत्र, पुणे यांचेकडे जोडपत्र अ मधील मुद्दा क्र.१ मधील पत्र दि. १६.५.२००७ च्या पत्राचा मुद्दा क्र.३ व ४ चे उत्तर, जोडपत्र अ मधील मुद्दा क्र.२ चे उत्तर दिले नाही, त्याबद्दल उत्तर, हा कायदा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाला लागू आहे का, लागू असेल तर त्यांचे पत्राला उत्तर का देण्यात आले नाही त्याची माहिती, दि. १.४.२००६ ते ३१.३.२००७ या कालावधीत किती कर्मचाऱ्यांची खातेकारवाई चालू झाली व किती लोकांची बंद करण्यात आली, अर्जदार दारिद्र्य रेषेखाली आहे का, याची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अपुरी व चुकीची दिल्याने अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर विक्रीकर आयुक्त, पुणे क्षेत्र यांचेकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपील निकाली काढले. मुद्दा क्र. ३ व मुद्दा क्र.१ बाबत माहिती न दिल्याच्या कारणावरून राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

त्यांच्या मूळ अर्जात (दि. १६.५.२००७ चा ) मुद्दा क्र. १ व ३ पाहता त्यामध्ये मे. न्यू संजय प्रोव्हीजन ॲण्ड जनरल स्टोअर्स संदर्भात कार्यवाही न करण्यासंदर्भात कारणे विचारणा केली आहेत. या संदर्भातही चौकशी होऊन अभिप्रायासंबंधी माहिती अपीलकर्त्यास दि. १६.६.२००७ च्या पत्रान्वये दिल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे. अधिकारी व संबंधित दुकान मालक श्री. पी.अे.कांबळे यांच्यावर कार्यवाहीची अपीलकर्त्याची मागणी आहे. ती बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.८.२००८

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश मारुती शिंदे
२७६३, वीर सावरकर रोड, बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

विरुध्द

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपालिका प्रशासन मंडळ, बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी
(२)अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.सोलापूर
(१)जन **माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, लेखापाल,
नगरपालिका शिक्षण मंडळ, बार्शी, जि.सोलापूर
(२) जन **माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, मराठी विद्यालय, बार्शी
(३)जन **माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक(प्राथमिक), सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५+११६+३६०+३६१+३६२+५१२+ ५४१ सोलापूर / २००६-२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश मारुती शिंदे
२७६३, वीर सावरकर रोड, बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपालिका प्रशासन मंडळ, बार्शी, जि.सोलापूर श्री.व्ही.के.खाडे
(१)जन **माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, लेखापाल,
नगरपालिका शिक्षण मंडळ, बार्शी, जि.सोलापूर श्रीमती अ.ना.कोरफळकर
(२) जन **माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, मराठी विद्यालय, बार्शी
श्रीमती हेमलता मोतीलाल पलसे
(३)जन **माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथम(प्राथमिक), सोलापूर
श्री.एस.डी.कदम

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ११५ | ४.१२.२००६ | -- | ४.१२.२००६ | -- |
| ११६ | ४.१२.२००६ | ३.१.२००६ | ६.१.२००७ | २३.१.२००७ |
| ३६० | १७.४.२००६ | २९.४.२००६ | १९.९.२००६ | २६.१०.२००६ |
| ३६१ | २८.२.२००६ | २३.३.२००६ | १७.४.२००६ | -- |
| ३६२ | १०.७.२००६ | २४.७.२००६ | ८.८.२००६ | ३.९.२००६ |
| ५१२ | ७.७.२००६ | २१.७.२००६ | ७.८.२००६ | -- |
| ५४१ | ८.८.२००७ | ७.९.२००७ | ११.९.२००७ | ८.११.२००७ |

०८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१.श्री भगवंत शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि.सोलापूर संचलित मराठी विद्यालय, बार्शी या विद्यालयाच्या संदर्भात व शिक्षण उपसंचालक यांचे आदेशाबाबत.
दि.२८. ११.२००५ च्या अर्जातील माहिती न दिलेबाबत.श्री.अमोल सुलाखे तथाकथित अध्यक्ष यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची प्रत
२.मराठी विद्यालय शाळेविषयी व संस्थेविषयी, प्रशासन अधिकारी, बार्शी नगरपालिका यांनी दिलेल्या पत्रावर केलेली कार्यवाही,प्रत उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे नाव पूर्ववत पदावर न घेण्याची कारणे. दि.४.८.२००५ रोजी दिलेल्या अर्जातील प्यारा नं.२ वर केलेली कार्यवाही. शालेय पोषण आहार, शिक्षक निश्चिती व तुकड्यांची संख्या, सन २००५-२००६ मध्ये मुख्याध्यापकांनी भोगलेल्या रजेबाबत,विस्तार अधिकारी यांनी केलेल्या वार्षिक तपासणी बाबत,
३.पगार बिले नोव्हेंबर २००५ पासून स्थगित ठेवण्याची कारण, कोणाच्या आदेशानुसार बिले मंजूर केली, श्रीमती पलसे व श्री.सराफ यांच्या पगाराबाबत, शाळेच्या मुख्याध्यापकाने कोणत्या तारखेस आपणाकडे बिले पाठविली व ती केव्हा मंजूर झाली,
४.कार्यालयास दिलेल्या दि.१९.८.२००५ च्या तक्रारी अर्जावर केलेली कार्यवाही, उपसंचालक,पुणे यांनी पाठविलेल्या पत्रावर केलेली कार्यवाही, मराठी विद्यालय शाळेवर प्रशासक नियुक्तीची कारणे कळविली असल्यास प्रत, श्री.अमोल सुलाखे अध्यक्ष असल्याबाबतचा पुरावा असल्यास त्याची प्रत, सरप्लस शिक्षकांची नांवे, श्रीमती पलसे निलंबित असताना पगार बिलांसाठी काढलेला पर्याय
५.शाळेची मान्यता काढून घेण्यासंदर्भात नियम व अटी यांचा खुलासा व नियम क्रमांक, पध्दत याची रितसर माहिती. वेतनवाढीचा खुलासा देऊनही तो निकाली काढला, कारण, कार्यालयात अपिलीय प्राधिकारी यांचा बोर्ड लावला आहे तेथे अपील केले असता ते अपिलीय प्राधिकारी नाहीत असा खुलासा दिला आहे, चुकीचा बोर्ड लावण्याचे कारण, चुकीची माहिती दुरुस्त करुन मिळणेबाबत.

| | |
|---|---|
| | ६.धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्यासमोर म्हणणे सादर केले त्याची प्रत,<br>सौ.मा.मि. देशपांडे यांच्या समावेशनाबाबत, श्री कांबळे, गटशिक्षणाधिकारी यांनी चौकशी करुन दिलेल्या अहवालाची प्रत व त्यावरील सर्व उपप्रश्न. |

## विवेचन

श्री भगवंत शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि.सोलापूर संचलित मराठी विद्यालय, बार्शी या विद्यालयाच्या संदर्भात विविध प्रकारची माहिती मागणारे अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे व त्याअनुषंगाने अपिले अपीलकर्ता श्री.सुरेश मारुती शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत. १)जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन मंडळ, बार्शी, २)मुख्याध्यापिका, मराठी विद्यालय, बार्शी, ३)अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी पथक, बार्शी यांच्याकडे केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने श्री.शिंदे यांनी ही अपिले केली आहेत. शाळेच्या कागदपत्रांपासून न्यायालयीन निर्णयांच्या अंमलबजावणीपर्यंत विविध विषयांबाबतची विस्तृत माहिती श्री.शिंदे यांनी मागितली आहे. वेळोवेळी ही माहिती त्यांना देण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी खुलाशात नमूद केले आहे, मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही, तर खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रत्येक वेळी दिली गेली, असे श्री.शिंदे यांनी म्हटले आहे.

श्री.शिंदे हे या संस्थेत शिक्षक आहेत. संस्थेत सन २००३ सालापासून वाद आहेत. २००४साली अध्यक्ष म्हणून श्री.अमोल सुरवसे यांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्याकडे बदल अहवाल (चेंज रिपोर्ट) पाठविला. सह-धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्याकडे आपण सातत्याने पत्रव्यवहार केला, परंतु अधिकृत संचालक मंडळाबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. मराठी विद्यालयाची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही आपण केली होती, परंतु दि.३१.५.२००८ पर्यंत शाळेला चालू ठेवण्यास शिक्षण, उपसंचालक, पुणे यांनी परवानगी दिली आहे. अक्षरशः रोज २-३ व्यक्ती अध्यक्ष असल्याचा दावा करतात अशा स्थितीत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याला आपल्याला मर्यादा येतात, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री.खाडे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. शाळा बंद करण्याच्या

कारवाईमुळे श्री.शिंदे यांच्यासह चार शिक्षक जादा ठरले, त्यांचे समावेशन करावे, असा आदेश शिक्षण उप-संचालकांनी दिला असल्याचेही त्यांनी नमूद केले. संस्थेत असलेल्या वादामुळे संधीचा गैरफायदा घेऊन श्री.शिंदे त्रास देतात, असे प्रतिपादन प्रशासन अधिकारी श्री.व्ही.के.खाडे व मुख्याध्यापिका श्रीमती हेमलता मोतीलाल पलसे यांनी केले. बँकेची फसवणूक केली या प्रकरणासह श्री.शिंदे यांच्याविरुध्द अनेक तक्रारी आहेत. तीच तीच माहिती वारंवार मागून व सातत्याने तक्रारी अर्ज आदी पत्रव्यवहार करुन श्री.शिंदे त्रास देतात, कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याबद्दलही त्यांच्याविरुध्द गुन्ह्याची नोंद आहे, असे प्रतिपादन प्रशासन अधिकारी श्री.खाडे यांनी केले. 'सदर अपीलकर्त्याने या कार्यालयात येऊन प्रशासन अधिकारी यांच्या अंगावर जाऊन अरेरावीची भाषा वापरुन शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केल्याबाबत, बार्शी शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि.नं.११/२००७, दि.१९.१.२००७ अन्वये प्रशासन अधिकारी यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. सदर अपीलकर्त्याचे वर्तन हे नाहक त्रास देणे हा उद्देश असून मूळ काम अध्यापन करणे हे असून ते न करता वरील प्रकारचे वरिष्ठ कार्यालयाकडे व या कार्यालयाकडे अर्ज करुन वरिष्ठांना नाहक त्रास देतात,' असे श्री.खाडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

आपण अनेक अर्ज केले असले तरी वारंवार तीच माहिती मागितलेली नाही. जसजशा पुढच्या घटना घडत गेल्या तसतशी पुढची माहिती मागितली आहे. श्री.अमोल सुलाखे यांचा अध्यक्ष असल्याचा दावा बेकायदेशीर असून त्यांनी आपल्याला संस्थेतून काढून टाकले, असे प्रतिपादन श्री.शिंदे यांनी केले.

श्री.शिंदे यांनी श्री.खाडे यांच्यावर विनयभंगापासून भ्रष्टाचारापर्यंत अनेक आरोप लेखी व तोंडी केले आहेत. श्री.खाडे यांनी आपला विनयभंग केला असल्याची तक्रार मुख्याध्यापिका श्रीमती पलसे यांनी केली असल्याचे श्री.शिंदे यांनी सांगितले. मात्र आपण अशा प्रकारचा आरोप श्री.खाडे यांच्यावर केलेला नाही, असे मुख्याध्यापिका श्रीमती पलसे यांनी स्पष्ट केले. श्री.शिंदे अनेकदा अपिलाच्या सुनावणीला हजर राहत नसल्याचे श्री.खाडे यांनी पूर्वीच्या पत्रांच्या प्रतींसह नमूद केले. मात्र श्री.खाडे यांनी एका अपिलाची सुनावणी ठेवली. त्यांच्या आदल्या

दिवशी आपल्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविला , आपणही त्यांच्याविरुध्द तक्रार दाखल केली, गुन्हा नोंदविल्यापासून आपण त्यांच्या कार्यालयात जाणे बंद केले असून सध्या हे प्रकरण न्यायालयात आहे. असे श्री.शिंदे यांनी नमूद केले. आपण नोंदविलेला फौजदारी गुन्हा काढून घेण्यासाठी श्री.शिंदे दमदाटी करीत असून दबाव आणण्याच्या हेतूने माहितीच्या अंतर्गत अर्ज व अपिले करीत आहेत, असे प्रतिपादन श्री.खाडे यांनी लेखी व तोंडी केले.

सातही अपिलांबाबतची एकूण परिस्थिती लक्षात घेता श्री.शिंदे यांनी विस्तृत प्रमाणावर माहिती मागितली आहे, तसेच अन्य स्वरुपाचाही पत्रव्यवहार विपुल प्रमाणात केला आहे. संस्थेने व प्रशासन अधिकाऱ्यांनी त्यांना उत्तरेही वेळोवेळी दिलेली आहेत. मात्र माहितीबरोबरच श्री.शिंदे यांनी जाब अथवा खुलासा अशीही विचारणा केलेली दिसते. आरोप-प्रत्यारोप हा उभय बाजूंच्या पत्रव्यवहारातील एक अविभाज्य भाग असल्याचे दिसून येते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोगाने सुनावणीच्या वेळी पुढीलप्रमाणे आदेश दिले:

(१) नेमकी कोणती माहिती द्यावयाची राहिलेली आहे, याची यादी श्री.शिंदे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना एका आठवड्यात द्यावी. ती पत्रे मिळाल्यापासून १५ दिवसात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी श्री.शिंदे यांना उपलब्ध माहिती द्यावी.

(२) जाब, खुलासा अथवा कारणे विचारणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नाही, याची श्री.शिंदे यांनी नोंद घ्यावी.

(३) संस्थेतील अंतर्गत वादामुळे व पदाच्या कायदेशीरपणाबाबतचा निर्णय सह-धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्याकडून न मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी व मुख्याधिकारी यांना येणाऱ्या अडचणी त्यांनी विस्ताराने स्पष्ट केल्या, त्याची नोंद आयोग घेत आहे.

(४) जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरत नाहीत.

(५) वैयक्तिक सूड उगविण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा वापर करणे स्वीकारार्ह नाही, याची जाणीव उभय बाजूंना देण्यात येत आहे.

अपिलीय प्राधिकारी नेमके कोण याबद्दल गोंधळाची स्थिती असल्याचे एकूण पत्रव्यवहारावरुन दिसते. प्रशासन अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुध्द श्री.शिंदे यांनी उपसंचालक, शिक्षण मंडळ, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु प्रशासन अधिकारी हेच अपिलीय प्राधिकारी असल्याचे शिक्षण उपसंचालकांनी नगरपालिकेला व प्रशासन अधिकाऱ्यांना कळविले. यात सहा महिन्यांहून अधिक काळ गेला. तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या दोन्ही अधिकारात श्री.खाडे यांनीच निर्णय केले, हे योग्य नाही. नंतरच्या काळात मुख्य लिपिक/लेखापाल हे जन माहिती अधिकारी व प्रशासन अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी अशी व्यवस्था करण्यात आल्याचे दिसते.

या निर्णयाच्या अनुषंगाने श्री.शिंदे यांनी दि.२५.२.२००८ रोजी संबंधितांकडे प्रत्येक अर्जानुसार स्वतंत्र पत्र सादर केले. त्यानुसार त्यांना माहिती देण्यात आली, असे श्री.खाडे यांनी दि.१२.३.२००८ च्या पत्रान्वये संबंधित माहितीच्या प्रतींसह आयोगाला कळविले. तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखाप्रमाणे सर्व माहिती आपण श्री.शिंदे यांना दिली आहे, माहितीच्या अधिकारात कारणे, खुलासा, त्रुटी विचारता येणार नाही असे आयोगाने स्पष्ट केले असतानाही अर्जामध्ये पुन्हा श्री.शिंदे यांनी तशा प्रकारची विचारणा केली आहे, असे मुख्याध्यापिका श्रीमती पलसे यांनी दि.११.३.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. तसेच आपण स्त्री असल्यामुळे आपल्याला त्रास देण्याच्या हेतूने ते माहिती अधिकाराचा गैरवापर करीत आहेत असेही पत्रात म्हटले आहे.

आपल्याला मुख्याध्यापिका व प्रशासन अधिकारी यांनी माहिती दिली, परंतु ती खोटी, दिशाभूल करणारी व फसवणूक करणारी आहे, असे श्री.शिंदे यांनी दि.१७.३.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. मात्र कोणतीही माहिती खोटी, दिशाभूल करणारी व फसवणूक करणारी नाही. अर्जात व अपिलात मागितलेलीच नव्हे, तर या विषयात या संदर्भात आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहितीही दिली आहे, असे श्री.खाडे यांनी दि.२१.३.२००८ च्या पत्रान्वये श्री.शिंदे यांना कळविले असून त्याची प्रत आयोगाला सादर केली आहे. सर्व माहिती निःशुल्क देण्यात आल्याचेही श्री.खाडे यानी नमूद केले आहे.

संस्थेत भ्रष्टाचार व गैरकारभार असून आपण तो बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे आपल्याला त्रास दिला जात आहे, असे श्री.शिंदे यांनी सर्व पत्रव्यवहारात व अपिलांसोबतच्या निवेदनात म्हटले आहे. मात्र उभय बाजूंची निवेदने व संपूर्ण कागदपत्रे पाहता उभय बाजूंमधील वादात सार्वजनिक हिताला प्राधान्य असल्याचे सिध्द होत नाही. शिक्षक असलेले श्री.शिंदे व प्रशासकीय अधिकारी असलेले श्री.खाडे या दोघांनीही सुसंस्कृततेची पातळी लेखी स्वरुपातही अनेकदा सोडली असल्याचे आयोग नापसंतीपूर्वक नमूद करीत आहे.

सह धर्मादाय आयुक्त, लातूर यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या संदर्भातील कायदेशीर स्थिती तातडीने स्पष्ट करणे नितांत गरजेचे आहे, तसेच उपसंचालक, शिक्षण मंडळ, पुणे यांनी संस्थेतील शैक्षणिक व तद्विषयक प्रशासकीय गैरकारभाराबाबत तपासणी करुन निश्चित स्वरुपाच्या नेमक्या सूचना देणे व त्यानुसार कार्यवाही करुन घेणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) सह धर्मादाय आयुक्त, लातूर व उपसंचालक, शिक्षण मंडळ, पुणे यांनी वरील अभिप्रायाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.३०.८.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.११.८.२००८
ऑगस्ट-०८-७०-७६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मामासो ऊर्फ संभाजी मधूकर चव्हाण<br>मु.पो. रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी (वर्ग-१)<br>पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे | हजर |

मौजे रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे येथील दलितवस्तीमध्ये मंजूर झालेल्या सौरदिप बाबत दोषी असणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी, असे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दि. १५.२.२००७ रोजी पत्र दिले होते. या अनुषंगाने दोषींवर काय कारवाई केली याबाबत खुलासा अपीलकर्ता श्री. मामासो ऊर्फ संभाजी मधूकर चव्हाण यांनी मागितला होता. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. परंतु माहिती चुकीची असल्याच्या कारणावरून श्री. चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर जि. पुणे यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला अहवाल बरोबर असल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान मान्य केले होते, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले होते. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार कार्यवाही झालेली होती. परंतु ऊर्वरित माहिती देण्याविषयी जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर श्री. के. सी. जाधव यांना सक्त ताकिद देण्यात आली होती, असेही अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात म्हटले आहे.

अपीलकर्त्याने 'खुलासा' मागणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये 'माहिती' या सदरी येत नाही. परंतु अनुषंगिक माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांचे दि. १३.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित ग्रामसेवक यांना श्री. चव्हाण यांच्या मूळ तक्रारीच्या अनुषंगाने ताकीद दिलेली आहे. ते अपीलकर्त्यास लेखी कळविणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. दलित वस्तीतील सौरदीपांबाबत ग्रामसेवक श्री. वाय.एच.शेख यास दि. १३.१२.२००७ रोजी ताकीद दिल्याबाबतच्या पत्राची प्रत अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास द्यावी.

पुणे
दि. २८.८.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रभू बाजीराव खंडागळे<br>मु. उपळाई रोड, देशमुख प्लॉट, श्रीकृष्ण कॉलनी, डी-६६, बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका कृषि अधिकारी<br>बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, कुर्डूवाडी,<br>ता. माढा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. प्रभू बाजीराव खंडागळे यांनी त्यांचे सेवापुस्तक वेतन पडताळणी पथक, पुणे-१ कडे दि. १.४.२००० ते १५.११.२००६ या कालावधीत किती वेळा पाठविले, त्या पत्राच्या प्रती, वेतन पडताळणी पथकाने नोंदविलेले आक्षेप व त्यास दिलेल्या उत्तराच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बार्शी यांच्याकडे मागितल्या होत्या.

माहिती मिळाली असल्याचे वरील तीनही घटकांमधील चर्चेत अपीलकर्त्याने लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३० .८.२००८**

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.१६ व १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमतताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२५० / पुणे | श्री. नरेश विष्णू डहाणूकर, रा. ५८७, बुधवार पेठ,पुणे | सह दुययम निबंधक, हवेली क्र.१, शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी,पुणे.३७ | जिल्हा सह निबंधक वर्ग-१ पुष्पा हाईटस् २ रा मजला, बिबवेवाडी, कॉर्नर, पुणे-३७ | दस्त ऐवज क्र. ५३४७/९४ मूळ दस्ताची मागणी | दि.२०.१२.२००७ रोजी माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याची लेखी पोहच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली. |
| २ | १२५४ / पुणे | श्री. ज्ञानदेव बापूराव वामन मु.पो.काळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती जुन्नर,जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती जुन्नर,जि.पुणे | ग्रामपंचायत, काळवाडी, पंचायत समिती, जुन्नर संबंधी माहिती | अपीलकर्ता मयत झालेला असल्याचे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी सादर केले. |
| ३ | ११९३ / पुणे | श्री. श्रीधर कुलकर्णी हर्षद को.ऑप.हौ. सोसायटी लि. स.नं.९, कोथरूड, पुणे-३ | नगर भूमापन अधिकारी क्र.१, पुणे | अधीक्षक, भूमि अभिलेख पुणे | कोथरूड नगर भूमापन क्र.६७५ या मिळकत पत्रिकेवर सविता चांदोस्कर यांचे नाव कसे लागले ? | अपीलकर्ता गैरहजर. मात्र त्यांनी दि. १५.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली ठेवणेस जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१ यांना व आयोगास कळविले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०६५ / पुणे | सौ. अनघा अनिल कुलकर्णी सेक्टर नं.२४, प्लॉट नं.३३०, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ | निवासी नायब तहसीलदार, तासगाव, जि. सांगली | तहसीलदार, तासगाव ता. तासगाव, जि. सांगली | सन २००१ मध्ये झालेल्या खरेदी-खताची नोंद झाली नाही, त्याची कारणे व ७/१२ वर नोंद होणेबाबत मागणी | अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त झाल्याचे व अपील निकाली काढणेबाबत दि. १३.७.२००८ रोजी आयोगास सादर केलेल्या निवेदनात कळविले आहे. |

वरील सर्व निष्कर्ष, उपलब्ध कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**